बाबा ऐसें कैसें करितां । दोघे स्नेही बरोबर येतां ॥
एकाची दक्षिणामागून घेतां । परततां देतां स्वयें दुजा ॥ २० ॥

संतापासीं कां ही विषमता । आपण होऊनि एका मागतां ॥
स्वेच्छे कोणी देतां परततां । हिरमोड करिता तयाचा ॥ २१ ॥

अल्पवित्तीं धरितां प्रीती । बहुता लागी निर्लोभ वृत्ती ॥
असतों मी जरी अपुले स्थिति । ऐसी न रीती आचरितों ॥ २२ ॥

शाम्या तुजला ठाऊक नाहीं । मी तो कोणाचें कांहीं न घेई ॥
येणें[1] मागे मशीदआई[2] । ऋणमुक्त होई देणारा ॥ २३ ॥

मजला काय आहे घर । किंवा माझा आहे संसार ॥
जे मज लागे वित्ताची जरूर । मी तो निर्घोर सर्वांपरी[3] ॥ २४ ॥

परी ऋण वैर आणि हत्या । कल्पांतींही न चुकती कर्त्या[4] ॥
देवी नवसिती गरजे पुरत्या । मज उद्धरित्यां[5] सायास ॥ २५ ॥

तुम्हांस नाहीं त्याची काळजी । वेळे पुरती करितां अंजीजी[6] ॥
अँनृणी[7] जो भक्तांमाजी । तया मी राजी सदैव ॥ २६ ॥

आरंभीं हा अकिंचन[8] तयासीं । पंधेरा[9] देतांच केलें नवसासीं ॥
पहिला "मुशाहिरा[10] देईन देवासी । भूल तयासी पडली पुढें ॥२७॥

पंध्राचे तीस झाले नंतर । तिसाचे साठ साठांचे शंभर ॥
दुप्पट चौपट वाढतां पगार । बळावला विसर[11]" अत्यंत ॥ २८ ॥

होतां होतां जाहले सातशें । पातले येथें निजकर्मवशें ॥
तेव्हां मी माझे पंधरा हे ऐसे । दक्षिणा मिषें मागितले ॥ २९ ॥

---

१ कोणापासून येणें ठरलेली रक्कम २ बाबा जींत वास करीत असत ती मशीद ३ सर्व बाजूंनीं ४ त्या करणाऱ्याला ५ भक्तोद्धार करणाऱ्या मला ६ अतिनम्रपणें केलेली विनवणी. ७ ज्याला ऋण नाहीं तो. ८ गरीब द्रव्यहीन. ९ पंधरा रुपये १० पहिला पगार ११ विस्मरण

आतां ऐक दुसरी गोष्टी[१] । फिरतां एकदां समुद्रकाठीं ॥
लागली एक हवेली मोठी । बैसलों ओटीवर तियेच्या ॥ ३० ॥

हवेलीचा ब्राह्मण मालक । होता कुलीन मोठा धनिक ॥
केलें स्वागत प्रेमपूर्वक । यथेष्ट अन्नोदक अर्पुनी ॥ ३१ ॥

तेथेंच एका फडताळा पाशीं । स्वच्छ सुंदर जागा खाशी ॥
दिधली मजला निजावयाशीं । निद्रा मजशीं लागली ॥ ३२ ॥

पाहूनि झोंप लागली सुस्त । दगड सारूनि फाडिली भिंत ॥
खिसा माझा कातरिला नकळत । नागविलें समस्त मज त्यानें ॥३३॥

जागा होता हें जंव कळलें । एकाएकीं रडूं कोसळलें ।
रुपये तीस हजार गेले । मन हळहळलें अत्यंत ॥ ३४ ॥

त्यातो होत्या अवघ्या नोटा । होतां ऐसा अवचित तोटा ॥
भरला माझे हृदयीं धडका । ब्राम्हण उलटा समजावी ॥ ३५ ॥

गोड न लागे अन्नपाणी । होऊनि ऐसा दीनवाणी ॥
पंधरा दिवस तेच ठिकाणीं । राहिलों बैसूनि ओटीवर ॥ ३६ ॥

पंधरावा दिवस संपता । सवाल करीत रस्त्यानें फिरतां ॥
फकीर एक आला अवचिता । मज रडतांना पाहिलें ॥ ३७ ॥

पुसे तो मज दुःखाचें कारण । केलें त्यातें समस्त निवेदन ॥
तो म्हणे हें होईल निवारण । करिशील सांगेन मी तैसें ॥ ३८ ॥

फकीर एक तुज सांगेन । देईन त्याचें ठावठिकाण ॥
तयालागीं जाई तूं शरण । तो तुज देईल धन तुझें ॥ ३९ ॥

परी मी सांगे तें आचरे व्रत । इच्छितार्थ प्राप्तीपर्यंत ॥
त्याग तूझा आवडता पदार्थ । तेणें तव कार्यार्थ साधेल ॥ ४० ॥

---

१ गोष्ट.

ऐसें करितां फकीर भेटला । पैका माझा मजला मिळाला ॥
मग मी तो धंडा सोडिला । किनारा धरिला पूर्ववत ॥ ४१ ॥
मार्ग क्रमितां लागली नाव । होई न तेथें मज शिरकाव ॥
तों एक शिपाई सुस्वभाव । देई मज ठाव नावेत ॥ ४२ ॥
लागोनि सुदैवाचा वारा । आली नाव ती परतीरा ॥
गाडींत बैसलों आलों जंव घरा । दिसलीया नेत्रा मशीदमाई ॥४३॥
येथें बाबांची गोष्ट सरली । पुढें शामासी आज्ञा झाली ॥
घेऊन जाई ही पाहुणे मंडळी । जेऊं त्या घाली घरासी ॥ ४४ ॥
असो; पुढें पात्रें वाढिलीं । माधवरावांस जिज्ञासा झाली ॥
पाहुण्यालागी पृच्छा केली । गोष्ट ती पटली कीं तुम्हां ॥ ४५ ॥
पाहूं जातां वास्तवीक । साईबाबा इथले स्थायिक ॥
नाहीं समुद्र नांव नाविक । तयां हें ठाऊक केव्हांही ॥ ४६ ॥
कैचा ब्राह्मण कैची हवेली । जन्म गेला वृक्षाचे तळीं ॥
कोठूनि एवढी संपत्ति आणिली । जी मग चोरिली चोरानें ॥ ४७ ॥
म्हणोनि ही गोष्ट निवेदिली । तीही तुम्ही येतांच आरंभिली ॥
एणेंमिषें तुम्हांसी पटविली । वाटे घडलेली पूर्व कथा ॥ ४८ ॥
तेव्हां पाहुणे होऊनि सद्गद । म्हणाले साई आहेत सर्वविंद ॥
परब्रह्म अवतार निर्द्वंद्व । अद्वैत अभेद व्यापक ॥ ४९ ॥
तयांनीं जी कथिली आतां । अक्षरें अक्षर ती अमुचीच कथा ॥
चला हें गोड भोजन सरतां । कथितों सविस्तरता तुम्हांते ॥ ५० ॥
बाबा जें जें बोलून गेले । तें तें सर्वचि कीं घडलेलें ॥
ओळख नसतां त्यां कैसें कळलें । म्हणून सगळें अघटित हें ॥ ५१ ॥

१ हवेली २ समुद्रकांठ ३, गलबत ( स्टीमर ) ४ सर्व कांहं

असो; पुरें होतां भोजन । माधवरावासहवर्तमान ॥
चालले असतां तांबूलचर्वण । कथानिरूपण आरंभिलें ॥ ५२ ॥

वदे दोघांमाजील एक । घाटचि माझा मूळ मुलूख ॥
परी त्या समुद्रपट्टीचा देव । होता अन्नोदक संबंध ॥ ५३ ॥
तदर्थ गेलों गोमांतकांत । नोकरी मिळवावी आलें मनांत ॥
आराधिला तत्प्रीत्यर्थ दत्त । नवसिला अत्यंत आदरें ॥ ५४ ॥

देवा-कुटुंब रक्षणार्थ । नोकरी करणें आहे प्राप्त ॥
तरी होऊनि कृपावंत । देई ती, लागत पायांस ॥ ५५ ॥

अद्य प्रभृति अल्पावकाशीं । जरी तूं निज ब्रीद राखिशी ॥
प्राप्ती जी होईल प्रथम मासीं । समग्र तुजसीं अर्पीन ॥ ५६ ॥

भाग्यें दत्त प्रसन्न झाला । अल्पावकाशीं नवसा पावला ॥
रुपये पंधरा पगार मजला । मिळूं लागला आरंभीं ॥ ५७ ॥

पुढें साईबाबांनीं वर्णिली । तैशीच माझी बढती जाहली ॥
सय नवसाची समूळ बुजाली । ती मज दिधली ये रीती ॥ ५८ ॥
कोणास वाटेल घेतली दक्षिणा । दक्षिणा नव्हे ती फेडिलें ऋणा ॥
दिधलें एणें मिषें मज स्मरणा । अत्यंत पुराण्या नवसाचें ॥ ५९ ॥
तात्पर्य साई द्रव्य न याचित । निजभक्तांसही याचूं न देत ॥
अर्थहा नित्य अनर्थ मानित । भक्तां न पाडित तन्मोहीं ॥ ६० ॥

म्हाळसापतीसारिखा भक्त । सदां साईपदीं अनुरक्त ॥
जरी संकटें चालवी चरितार्थ । तया न लव अर्थ जोडूं दे ॥ ६१ ॥
स्वयें साई लोकां अनेकदां । दक्षिणामिषें आलेली संपदा ॥
वांटी परी न कपर्दिक कदा । देईन आपदात्रस्ता त्या ॥ ६२ ॥
तोही मोठा बाणेदार । जरी साई ऐसा उदार ॥
कधीं न तेणें पसरिला कर । याचना तत्पर होउनी ॥ ६३ ॥

सांपत्तिक स्थिति निकृष्ट । परी वैराग्य अति उत्कृष्ट ॥
वेठी गरीबीचेही कष्ट । अल्पसंतुष्ट सर्वदा ॥ ६४ ॥
एकदां एक दयाळ व्यापारी । हंसराज अभिधानधारी ॥
म्हाळसापतीस कांहीं तरी । द्यावेसें अंतरीं वाटलें ॥ ६५ ॥
पाहूनि गरिबीचा संसार । करावा शक्य तो उपकार ॥
लावावा कांहीं हातभार । सहज सुविचार हा स्फुरला ॥ ६६ ॥
ऐसी जरी तयाची अवस्था । इतर कोणीही देऊं जातां ॥
तेंही नावडे साईनाथा । द्रव्यीं उदासता आवडे ॥ ६७ ॥
मग तो व्यापारी काय करी । द्रवूनि त्या भक्तार्थ अंतरीं ॥
दोघेही समक्ष असतां दरबारीं । द्रव्य सारीत त्याकरीं ॥ ६८ ॥
होऊनिया अति विनीत । म्हाळसापती करी तें परत ॥
म्हणे साईचिया आज्ञेविरहीत । मजला न करवत स्वीकार ॥ ६९ ॥
भक्त नव्हता हा पैशाचा । मोटा भुकेला परमार्थाचा ॥
पदीं विनटला कायावाचा । प्रेमळ मनाचा निःस्वार्थी ॥ ७० ॥
हंसराज साईतें विनवी । साई एका कवडीस न शिववी ॥
वदे मद्भक्तांही द्रव्य न भुलवी । वित्ताच्या वैभवीं नगवेतो ॥ ७१ ॥
पुढें मग तो दुसरा पाहुणा । म्हणे माझ्याही पटल्या खुणा ॥
परिसा करितों समग्र कथना । येईल श्रवणा उल्हास ॥ ७२ ॥
पस्तीस वर्षांचा माझा ब्राह्मण । निरालस आणि विश्वासू पूर्ण ॥
दुर्दैवें बुद्धिभ्रंश होऊन । करी तो हरण मम ठेवा ॥ ७३ ॥
माझिया घराच्या भिंतींत । फडताळ आहे बसविलें आंत ॥
तेथील चिरा सारूनि अलंगत । पाडिलें नकळत छिद्र तया ॥ ७४ ॥
बाबावर जें फडताळ वदले । त्यासचि त्यानें छिद्र पाडिलें ॥
तदर्थ भिंतीचे चिरे काढिले । सवा[१] निजलेले ठेवून ॥ ७५ ॥

१ अगदीं हळू

पुढे बाबा आणीक वदले । रुपये माझे चोरुन नेले ॥
तेही अवघें सत्यत्वें भरलें । पुडकें नेलें नोटांचे ॥ ७६ ॥

तीस हजारचि त्यांची किंमत । नकळे बाबांस कैसे अवगत ॥
श्रम संपादित जातां वित्त । बसलों मी रडत अहर्निश ॥ ७७ ॥

शोध लावितां थकली मती ॥ नकळे कैशी करावी गती ॥
पंधरा दिवस चिंतावर्तीं । पडलों निर्गती लागेना ॥ ७८ ॥

एके दिवशीं ओटीवर । बसलों असतां अति दिलगीर ॥
वाटेनें चालला एक फकीर । सवाल करित करीत ॥ ७९ ॥

पाहूनि मज खिन्नवदन । फकीर पुसे खेदाचें कारण ॥
मग मी करितां साद्यंत निवेदन । सांगे निवारण तो मज ॥ ८० ॥

कोपरगांव तालुक्यास । शिरडी नामक एका गांवास ॥
करी साई अवलिया वास । करी तयास तूं नवस ॥ ८१ ॥

आवड तुझी जयावर । तयाचें सेवन वर्ज्य कर ।
" दर्शन तुमचें होईतोंवर । वर्जिलें " साचार वद तयां ॥ ८२ ॥

ऐसें मज फकीरें कथितां । अन्न वर्जिलें क्षण न लागतां ॥
वदलों " बाबा चोरी मिळतां । दर्शन होतां सेवीन तें " ॥ ८३ ॥

पुढे एकाचि पंधरवडा गेला । नकळे काय आलें मनाला ॥
ब्राह्मण आपण होऊन आला । ठेवा दिधला मज माझा ॥ ८४ ॥

म्हणे माझी बुद्धि चळली । तेणें ही ऐसी कृती घडली ॥
आतां पायीं डोई ठेविली । क्षमा मी केली ऐसें वदा ॥ ८५ ॥
असो; पुढें झालें गोड । साईदर्शनीं उदेली आवड ॥
तेंही आज पुरविलें कोड । धन्य ही जोड भाग्याची ॥ ८६ ॥

१ चिंतेच्या भोवऱ्यात

असतां खिन्न दुःखी संकटीं । वसतों असतां आपुले ओटीं ॥
आला जो मज सांत्वनासाठीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८७ ॥
जया माझी कळकळ पोटीं । जेणें कथिली साईची गोठी ॥
जेणें दाविली शिरडी बोटीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८८ ॥
जयाची मज अवचित गाठी । सवाल घालीत आला जो वाक्पुटीं ॥
नवस करवूनि गेला शेवटीं । पुनरपि भेटी न तयाची ॥ ८९ ॥
तोच फकीर वाटे साचा । साईच हा अवलिया तुमचा ॥
लाभ आम्हां निज दर्शनाचा । द्यावया लाचावला स्वयें ॥ ९० ॥
कोणी कांहीं घेऊं लाचावती । मज या दर्शनीं इच्छाही नव्हती ॥
फकीर आरंभीं करी प्रवृत्ति । वित्त-प्राप्ती प्रीत्यर्थ ॥ ९१ ॥
तेंही वित्त जयाच्या नवसें । प्राप्त झालें अप्रयासें ॥
तो काय माझ्या या पसंतिसें । लाचावे ऐसें न घडेच ॥ ९२ ॥
उलट आम्हीं अज्ञान नर । आम्हां करावया परमार्थ तत्पर ॥
आमुच्या कल्याणीं झटे निरंतर । आणी वाटेवर या मिषें ॥ ९३ ॥
एतदर्थचि हा अवतार । ना तों आम्हीं अभक्त पामर ॥
होता कैंचा हा भव पार । करा कीं विचार स्वस्थपणें ॥ ९४ ॥
असो; चोरी मिळाल्यावर । झाला मज जो हर्ष फार ॥
परिणामीं पडला नवसाचा विसर । मोह दुर्धर वित्ताचा ॥ ९५ ॥
पुढें पहा एक दिवस । असतां कुलाब्याचे बाजूस ॥
स्वप्नीं पाहिलें मी साईस । तैसाच शिर्डीस निघालों ॥ ९६ ॥
समर्थें कथिला निजप्रवास । मनाई नावेंत चढावयास ॥
शिपायानें करितां प्रयास । चुकला सायास तें सत्य ॥ ९७ ॥
या तो सर्व माझ्या अडचणीं । पातलों जेव्हां नावेच्या ठिकाणीं ॥
खरेंच एक शिपाई कोणी । करी मनधरणी मजसाठीं ॥ ९८ ॥

१ पस्तीस रुपयाच्या दक्षिणेनें.

तेव्हांच नावेचा अधिकारी । आरंभीं जरी मज धिःकारी ॥
देवूनि मज वांव नावेवरी । केलें आभारी मज तेणें ॥ ९९ ॥

शिपाईही अगदीं अनोळखी । म्हणे यांची माझी ओळखी ॥
म्हणोनि आम्हां कोणी न रोखी । बैसलों सुखीं नावेत ॥ १००॥

ऐसी ही नावेची वार्ता । तैशीच ती शिपायाची कथा ॥
आम्हांसंबंधें घडली असतां । घेती निज माथां साई हे ॥ १०१ ॥

पाहूनि ऐसी अद्भुत स्थिती । कुंठित होते माझी मती ॥
वाटे मज इत्थंभूत जगतीं । भरले असती हे साई ॥ १०२ ॥

नाहीं अणूरेणू पुरती । जागा[1] ययांच्यावीण रीती ॥
आम्हांस जैसी दिधली प्रचीती । इतरांही देतील तैशीच ॥ १०३ ॥

आम्हीं कोण, वास्तव्य कोठें । केवढें आमुचे भाग्य मोठे ॥
ओढून आम्हास नेटेपाटें । आणिलें वाटेवर हें ऐसे ॥ १०४॥

काय आम्हीं नवस करावा । काय आमुचा ठेवा चोरावा ॥
काय नवस फेडीचा नवलावा । ठेवाही मिळावा आयता ॥ १०५ ॥

काय आमुचें भाग्य गहन । नाहीं जयाचें पूर्वी दर्शन ॥
नाहीं चिंतन नाहीं श्रवण । तयाही स्मरण आमुचें ॥ १०६ ॥

मग तयाचिया संगतींत । वर्षोन वर्षें जे जे विनटत ॥
जे जे अहर्निश तत्पद सेवित । भगवद्भक्त ते धन्य ॥ १०७ ॥

जयासंगें साई खेळले । हंसले, बसले, बोलले, चालले ॥
जेवले, पहुडले रागेजले[2] । भाग्यागळे[3] ते सर्व ॥ १०८ ॥

कांहीं हीन घडतां आम्हां हातीं । इतुकें आम्हा जैं कळवळती ॥
तुम्हांतेंही नित्य संगती ॥ भाग्य स्थिती धन्य तुमची ॥ १०९ ॥

---

१ जागा २ रागावले. ३ भाग्यवान.

वाटे तुमच्या पुण्यार्जित राशींनी । धारण करूनि मनुष्याकृती ॥
तुम्हींच परम भाग्यवंतीं । आणविली ही मूर्ती शिरडींत ॥ ११० ॥

अनंत पुण्याईच्या कोडी । तेणें आम्हां लाधली शिरडी ॥
वाटे श्रीसांईच्या दर्शनपरवडी । करावी कुरवंडी सर्वस्वीं ॥ १११ ॥

साई सज्जन स्वयें अवतार । महा वैष्णवसा आचार ॥
ज्ञानद्रुमाचा कोंभचि साचार । शोभे हा भास्कर चिदंबरीं ॥ ११२ ॥

असो, अमुची ही पुण्याई ॥ म्हणोनि भेटे ही मशीद आई ॥
नवस आमुचे फेडून घेई । दर्शन देई सवेंच ॥ ११३ ॥

आम्हां हाच आमुचा दत्त । एणेंच आज्ञापिलें तें व्रत ॥
एणेंच आम्हां वसविलें नावेंत । दर्शना शिरडींत आणिलें ॥११४॥

ऐसी सर्व व्यापकतेची । निज सर्वांतर्यामित्वाची ॥
दिधली सांईनीं जाणीव साची ॥ साक्षित्वाची सर्वत्र ॥ ११५ ॥

पाहोनिया सस्मित मुख ॥ झालें मनीं परम सुख ॥
म चीं विसरे प्रपंच दुःख । नसमाये हरिख परमार्थी ॥ ११६ ॥

होणार होवो प्रारब्धगती । ऐशी व्हावी निश्चित मती ॥
साईचरणीं अखंड प्रीती । राहो ही मूर्ती नित नयनीं ॥ ११७ ॥

अगाध अगम्य साई-लीला । सीमा नाहीं उपकाराला ॥
वाटे तुम्हांवरुनी दयाळा । ओवाळावा हा देह ॥ ११८ ॥

असो, आतां ऐका कथांतर । सावधान होऊनि क्षणभर ॥
साईमुखीं वदले जे अक्षर । तें तो निर्धार ब्रह्मलेख ॥ ११९ ॥

सखाराम औरंगाबादकर । निवासस्थान सोलापूर शहर ॥
पुत्र संतानालागी आतुर । पातलें कलत्र शिरडीस ॥ १२० ॥

साईबाबा संतपवित्र । ऐकून त्यांचें अगाध चारित्र ॥
सवें घेऊन सापत्नपुत्र । आली सत्पात्रदर्शना ॥ १२१ ॥

सत्तावीस वर्षे न्हातां । गेली एकं न संतानवार्ता ॥
थकली देवदेवी नवसितां । निराशचित्ता जाहली ॥ १२२ ॥

असो; ऐसी ती सुवासिनी । हेतू धरू नि बाबांचे दर्शनी ॥
आली ऐसी गिरडीलागुनी । विचार मनीं उद्भवला ॥ १२३ ॥

बाबा सदा भक्तजनवेष्टित । कैसे मज सांपडती निवांत ॥
कैसें कथिजेल माझें हृद्गत । म्हणोनि सचिंत जाहली ॥ १२४ ॥

उघडी मशीद उघडें अंगण । बाबाभोंवतें सदां भक्तगण ॥
कैसा मिळेल निवांत क्षण । आर्द्र निवेदन व्हावया ॥ १२५ ॥

ती आणि तीचा सुत । नाम जयाचें विश्वनाथ ॥
राहिले दोन महिनेपर्यंत । सेवा करीत बाबांची ॥ १२६ ॥

एकदां माधवरावां विनवणी । विश्वनाथ अथवा कोणी ॥
बाबांपाशीं नाहीं पाहुनी । करी ती कामिनी ती परिसा ॥ १२७ ॥

तुम्ही तरी पाहूनि अवसर । माझिया मनीचें हें हार्द ॥
पाहूनि बाबा शांतस्थीर । घाला कीं कानावर तयांचे ॥ १२८ ॥

तेही जेव्हां असती एकले । नाहीं भक्त परिवारें वेढिले ॥
तेव्हांच कीं हें सांगा वहिलें । कोणी न ऐकिलें जाय असे ॥ १२९ ॥

माधवराव प्रत्युत्तर करिती । मशीद ही तो कधीं न रीती ॥
कोणी ना कोणी दर्शनार्थी । येतचि असती निरंतरी ॥ १३० ॥

साईचा हा दरबार खुला । येथें मज्जाव नाहीं कुणाला ॥
तथापि ठेवितों सांगून तुजला । आण कीं खुलासा हा ध्यानीं ॥ १३१ ॥

प्रयत्न करणें माझें काम । यशदाता मंगल धाम ॥
अंतीं तोचि देईल आराम । चिंतेचा उपशम होईल ॥ १३२ ॥

तूं मात्र बैस घेऊनि हातीं । नारळ एक आणि उदबत्ती ॥
सभामंडपीं दगडावरती । बाबा जेवूं बैसती तें ॥ १३३ ॥

मग मी भोजन झालियावरती । पाहीन जेव्हां आनंदित वृत्ती ॥
खुणावीन कीं तुजप्रती । तेव्हांच वरती यावें त्वां ॥ १३४ ॥

असो; ऐसें करितां करितां । प्राप्त घडीचा योग येतां ॥
एकदा साईचें भोजन उरकतां । पातली अवचिता ती संधी ॥१३५॥

साई आपुले हस्त धूतां । माधवराव वस्त्रानें पुसतां ॥
आनंद वृत्तीमध्यें असतां । ते काय करितात पहावें ॥ १३६ ॥

प्रेमोल्हासें माधवरावाचा । बाबा तंव घेती गालगुच्चा ॥
ऐसी ये संधीचा देवा-भक्ताचा । संवाद वाचा प्रेमाचा ॥ १३७ ॥

माधवराव विनयसंपन्न । परी रागाचा आव दावून ॥
विनोदें म्हणती बाबालागून । हें काय लक्षण बरें का ? ॥ १३८ ॥

नलगे ऐसा देव खटयाळ । गालगुच्चे जो घेई प्रबळ ॥
आम्ही काय तुझे ओशाळ । सलगीचें फळ हें काय? ॥ १३९ ॥

तवं बाबा प्रत्युत्तर देत । कधीं अवघ्या बहात्तर पिढींत ॥
लाविला रे श्या तुज हात । असे कां स्मरत पहा बरें ॥ १४० ॥

तव बोलती माधवराव । आम्हां पाहिजे ऐसा देव ॥
देईल जो मुके सदैव । मिठाई अभिनव खावया ॥ १४१ ॥

नलगे आम्हां तुझा मान । अथवा स्वर्गलोकींचें विमान ॥
जागो तुझिये पायीं इमान । इतुकेंचि दान देई मज ॥ १४२ ॥

तंव बाबा लागले बोलों । एतदर्थचि मी येथें आलों ॥
तुम्हांस खाऊं घालूं लागलों । लागलों लोलो मज तुमचा ॥१४३॥

---

१ आवड; प्रेम

इतुके होतां कठड्यापाशीं । बाबा बैसतां निजासनासी ॥
माधवराव करितां खुणेसीं । बाई निजकार्यासी सावध ॥ १४४ ॥
खूण होतांच तात्काळ उठली । लगबगीनें पायऱ्या चढली ॥
बाबांचिया सन्मुख आली । नम्र झाली सविनय ॥ १४५ ॥
तात्काळ चरणी अर्पिलें श्रीफळ ॥ वंदिले मग चरणकमळ ॥
बाबानीं निज हस्तें तो नारळ । हाणितला सबळ कठड्यावरी ॥१४६॥
म्हणती शामा हा काय म्हणतो । नारळ फारचि रे गुडगुडतो ॥
शामा मग ती संधी साधतो । काय वदतो बाबांस ॥ १४७ ॥
माझिये पोटीं ऐसेच गुडगुडो । बाई ही मनीं म्हणे तें घडो ॥
अखंड मन तंव चरणीं जडो । कोडें उलगडो तियेचें ॥ १४८ ॥
पाही तिजकडे कृपादृष्टी । टाक तो नारळ तिचे ओटीं ॥
तुझिया आशिर्वादें पोटीं । बेटा बेटी उपजोत ॥ १४९ ॥
तंव बाबा तया वदती । काय नारळें पोरें होती ॥
ऐशा कैशा वेड्या समजुती । चळले वाटती जनलोक ॥ १५० ॥
शामा वदे आहे ठाऊक । तुझिया बोलाचें कौतुक ॥
लेंडार मागें लागेल आपसुख । ऐसा अमोलिक बोल तुझा ॥१५१॥
परी तूं सांप्रत धरिशी भेद । नेदिशी खरा आशिर्वाद ॥
उगाच घालीत बससी वाद । नारळ प्रसाद देई तिस ॥ १५२ ॥
नारळ फोड बाबा वदत । शामा वदे टाक पदरांत ॥
ऐसी बरीच होतां हुजत । हारीस येत तंव बाबा ॥ १५३ ॥
म्हणती होईल जारे पोर । शामा म्हणे कधीं दे उत्तर ॥
वदतां बारा महिन्यानंतर । नारळ ताडकर फोडिला ॥ १५४ ॥
अर्धभाग दोघीं सेविला । अर्ध राहिला बाईतें दिधला ॥
माधवराव वदे बाईला । माझिया बोला तूं साक्षी ॥ १५५ ॥

बाई तुज आजपासून । बारा महिने नव्हतां पूर्ण ॥
जाहलें नाहीं पोटीं संतान । काय मी करीन तें परिस ॥ १५६ ॥

ऐसाच नारळ डोकींत घालून । या देवाला मशीदींमधून ॥
मी न जरी लावी काढून । तरी न म्हणवीन माधव ॥ १५७ ॥

ऐसा देव न मशीदींत । ठेवूं देणार वदतों खचित ॥
येईल वेळीं याची प्रचित । निर्धार निश्चित हा मान ॥ १५८ ॥

ऐसें मिळतां आश्वासन । बाई मनीं सुखायमान ॥
पायीं घालोनि लोटांगण । गेली स्वस्थमन निज ग्रामा ॥ १५९ ॥

पाहूनि शामा नित्यांकित । रक्षावें भक्त मनोगत ॥
साई प्रेमरज्जूनियंत्रित । आला न किंचित कोप तया ॥ १६० ॥

खरें कराया भक्तवचन । प्रणतपाळ करुणाघन ॥
साई दयाळ भक्ताश्वासन । लडिवाळपण पुरवीत ॥ १६१ ॥

शामा अपुला लाडका भक्त । लडिवाळ नेणों युक्तायुक्त ॥
संत भक्तसंकल्प पुरवित । हेंच निजव्रत तयाचें ॥ १६२ ॥

असो, भरतां बारा मास । कृत निर्धार नेला तडीस ॥
तीनचि महिने होतां बोलास । पातलें गर्भास संतान ॥ १६३ ॥

भाग्यें जाहली पुत्रवती । पांचा महिन्याचें बाळ संगती ॥
घेऊनि आली शिरडीप्रती । पतिसमवेती दर्शना ॥ १६४ ॥

पतीनें ही आनंदोनी । साई समर्थ चरण वंदोनी ॥
पायीं पंचशत रुपये अर्पुनी । कृतज्ञ निज मनीं जाहला ॥ १६५ ॥

बाबांचा वारू शामकर्ण । तयाचें सांप्रत वसतिस्थान ॥
तयाच्या भिंती घेतल्या बांधून । रुपये लावून हेच पुढें ॥ १६६ ॥

म्हणोनि ऐसा साई ध्यावा । साई स्मरावा साई चिंतावा ॥
हाच हेमाडा निज विसावा । करी न धांवाधांव कुठें ॥ १६७ ॥

निज नामींत असतां पदादी । किमर्थ जागावें विदोविदीं ॥
अखंड विनटत साईपदीं । हेमाड निरवधि सुख लाहे ॥ १६८ ॥

पुढील अध्याय याहून रसाळ ॥ कैसे बाबांसी भक्त प्रेमळ ॥
शिर्डींतून चावडीजवळ । मिरवीत सकळ आनंदें ॥ १६९ ॥

तैसीच बाबांच्या हंडीची कथा । प्रसाददान विनोदवार्ता ॥
पुढील अध्यायीं परिसिजे श्रोतां । चढेल उल्हासता श्रवणास ॥१७०॥

स्वस्तिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । साईसर्वव्यापकता तदाशिर्ववचन
साफल्यतानाम् । षट्त्रिंशत्तमोध्यायः संपूर्णः
श्रीसद्गुरू साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ।

## अभिप्राय

श्रीसाईनाथ आणि कंपनीचें इ० स० १९२६ चें क्यालेंडर सदर कंपनीचे मालक रा. रा. शंकर गणपत शिंदे ६४७ शनिवार पेठ पुणें सिटी याजकडून आदरपूर्वक पाठविण्यात आलें त्याचा धन्यवादपूर्वक साभार स्वीकार करण्यात येत आहे रा. शंकरराव हे श्रीसाईबाबांचे प्रेमळ भक्त असून श्रीसाईलीला मासिकाचे एक वर्गणीदार आहेत. सदर कंपनी इ० स० १९२३ मध्ये स्थापन होऊन क्यालेंडरवर जाहिर केल्याप्रमाणें या कंपनीत पेटंट मेडिसिन्स मिळत असून शिवाय ही कंपनी प्रोव्हिजन व जनरल मर्चंटचें व कमीशनएजंटचेही काम करीत असते. तिची कौमारावस्था हळू हळू संपत आहे व ती लवकरच वयात येऊन तिची पूर्ण भरभराट होवो असेंही श्रीसाईलीला मनापासून इच्छित आहे. कुंजवनात मुरलीधर श्रीगोपालकृष्ण मुरली वाजवीत असता त्या मुरलीच्या मधुर रवानें गोपींची काय अवस्था झाली असेल याचा निदर्शक एक रम्य देखावा या क्यालेंडरावर दिल्यामुळें त्याला फारच शोभा आली आहे. या गोपालकृष्णाच्या व श्रीसाईसमर्थांचे कृपेनें ही कंपनी चिरायू होवो.

---

## महाराष्ट्र साहित्य संमेलन

महाराष्ट्र साहित्य संमेलनाची अकरावी बैठक खास मुंबईंतच येत्या ईस्टरचे सुट्टीचे सुमारास भरविण्याची नक्की योजना महाराष्ट्र साहित्य परिषदेचें कार्यकारी मंडळीनें केली आहे. नागपूर व नाशिक या दोहों ठिकाणींही सदर बैठक होत नाहीं असें दृष्टीस आल्यावर, मुंबईंतच भरविण्याचें ठरवावें लागलें तरी संम्मेलनात वाचण्यासाठीं व छापून प्रसिद्ध करण्यासाठीं सर्व महाराष्ट्रभाषाभिमानी व भक्त अशा कवींनीं व लेखकांनीं आपल्या आवडत्या विषयांवर कविता व लेख पाठविण्याची मेहेरबानी करावी. स्वतंत्र पत्राची वाट पाहूं नये, अशी चिटणिसांची अत्यागत्याची विनंती आहे.

म. सा. परिषदेची कचेरी<br>
२७२ गिरगाव रोड,<br>
मुंबई नं २.<br>
१६–२–१९२६

न. र. फाटक<br>
बी. व्ही. रायकर<br>
रा. का. तटणीस<br>
डी. जी. काळे<br>
चिटणीस<br>
११ वे म. सा. संमेलन.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक

वर्ष ३ रें.] माघ शके १८४७ [अंक ११ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशक—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... | ४०७-४२२ |
| स्फुट विषय ... | ४२३-४२८ |
| श्री साईसच्चरित ... | ४२९-४४६ |


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हे मासिक सुरू करण्यात याच्या चालकाचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेले उत्पन्न श्रीसाईबाबाच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदाराने मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यामधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचे श्रेय घेतल्यास एकंदरीने कितीतरी मदत केल्यासारखे होणार आहे. शिवाय अशा रीतीने मदत करणाऱ्याने श्रीसाईसमर्थांची पर्यायाने सेवा केल्यासारखेच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकास दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टात क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळे जर ग्राहकानीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हा अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणे तो खालीं सही करणार याचे नांवाने खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे बी बी. सी. आय. रेल्वे.

## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरने अगाऊ रु ३।=व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।=. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

पूर्वीच्या अंकात व्ही. पी. ने रु. ३॥= चुकून छापलें गेले. असेच यंदा ज्या कांहीं वर्गणीदाराकडे रु.३॥। ची व्ही.पी. चुकून गेली, त्याचे -।- आमचेकडे जमा आहेत. अशा वर्गणीदारांनीं -।- परत मागितल्यास पाठवून देऊं.

श्री साईलीला कर्ते यांस—सा. न. वि. वि.

श्री समर्थ साईनाथाबद्दलचे अनुभव लिहिणे म्हणजे प्रत्येकानें आपल्या प्रत्येक क्षणाचे निरीक्षण करणे होय. कारण अनुभव येत नाही, असा एक क्षणही जात नाही पुढील मजकुरास " श्री साईलीला " मासिक-रुपी साईचरणीं यथावकाश स्थान मिळेल अशी आशा आहे.

आमचे वडील आमच्या लहानपणी निवर्तल्यामुळे माळूग सोडून आम्हांस ठाण्यास यावें लागले. वडील मारुती उपासक ( रामदासी ) होते. आम्हास वडिलांचे मागें आमचे आत्यानी लहानाचे मोठे करून आमचे कडून थोडासा विद्याभ्यास करविला. माझा इंग्रजी अभ्यास थोडा झाल्यानंतर आमचे स्थितीप्रमाणे मला नोकरी धरून धाकट्या भावास थोडेंतरी शिक्षण देणे भाग झाले. त्याप्रमाणे मी मुंबईस खटाव मकनजी मीलमध्ये नोकरी पतकरिली व ठाण्यास स्वतःचे बिऱ्हाड केले.

आमची मातोश्री आमचे वडिलांचे सहवासाने खरी सुशिक्षित बन-लेली होती. अलीकडील सुशिक्षित व तार्किक मंडळींचीं काहीं चुकीचीं ( स्वधर्माबद्दल ) मते खडन करण्यांत तिचा हातखंडा असे. सर्व भिकाऱ्यांस ती यथाशक्ति मदत करीत असे. परंतु फकिरांकडे मात्र विशेष आदरदृष्टीनें पहात असे. याचे कारण तिला आम्ही भावंडें वारवार विचारीत असूं. मी म्हणे हिंदू भिकारी सर्व मेले कीं काय ? तूं फकिराचें काय घेऊन खाल्लें आहेस? याबद्दलचा उलगडा तिनें पुढीलप्रमाणें केला तो असा. ती म्हणाली तुझ्या वडिलांस जरी लहानपणापासून विद्येचा नाद असला तरी पण ते ठाणें जिल्ह्यांत गेले असतांना त्यांना एका फकिरानें प्रसाद दिल्यापासून ते आपल्या अल्पवयांतच कीर्ति मिळवून गेले. कीर्तन, ज्योतिष, गायन, सात्विक पंचाक्षरी ( मंत्रविद्या ) विद्या यांचा त्यांना बराच अभ्यास असून वैद्यकींत तर त्यांचा हातखंडा असे. असो.

मी खटाव मकनजी मीलमध्यें असतांना व त्यापूर्वीही श्री साईनाथांची कीर्ति वारंवार ऐकूं येत असल्यामुळें व मी स्वतः फार अशक्त व वारंवार सीक

पडत असल्यामुळे आमचे मातोश्रीचे मनात मी शिरडीस जाऊन श्रीचरणरजस्पर्शाने पुनीत होऊन यावे असे होते व माझीही तीव्र इच्छा होती. परंतु हे आमचे दरिद्र्याचे मनोरथ 'उत्पद्यंते विलीयंते' असे होत असत. कारण माझा पगार रुपये १५ व शिर्डीस जाऊन येण्याचा खर्च रु १५ आता हा योग येणे म्हणजे डोंगराने महमदाकडे चालून जाणे होय असे वाटून मी स्वस्थ बसलो. ठाण्यास एकेवेळीं जिकडे तिकडे उदीर पडू लागले याचवेळीं माझ्या धाकट्या बंधूंना बराच ताप आला. आमचे बिऱ्हाडा समोरच मिशनरी दवाखाना होता व तेथील डॉक्टर फारच कनवाळू व आपल्या विद्येत पूर्ण पारंगत असत. त्याचे हाताखालीं एक पार्शी मदत डॉक्टर असून त्यानींही या डॉक्टरच्या सहवासाने आपली योग्यता लोकांस पटवून प्रीतिसंपादन केली होती. वरील दोन्ही डॉक्टरास मी आमचे भावास दाखवून तपासविले व त्यानीं हा ताप विषारी, कदाचित् ग्रंथीज्वर, असण्याचा संभव आहे कारण याची मान दुखत आहे म्हणून जपले पाहिजे इतके सांगून योग्य औषधयोजना केली व आम्हांस न घाबरण्याविषयीं सांगितलें. घरीं आणून त्याला औषध दिलें. व मी नोकरीवरून रजा घेऊन येतो. म्हणून मातोश्रीस सांगितले, ती म्हणाली बेलाशक जा. उपचार करणें आपले काम आहे गुण देणार श्री आहेत. तूं घरीं राहून काय करणार ?

मी मीलमध्ये गेलों तो आमचे म्यानेजर साहेब श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यानां एक पत्र श्रीशिर्डीहून आलें होतें त्यात येथील बाबाचे विहिरीचा पप बिघडला आहे कोणी तरी चांगला नीट करणारा धाडून द्या असा मजकूर असल्यामुळें त्याकामीं त्या मीलमध्यें असलेले रा. वामनराव विठोबा इंजिनियर याची योजना झाली व त्यामुळें हा योग अनायासें आल्यामुळें रा. वामनराव सहकुटुंब जावयास निघाले आमच्या म्यानेजरसाहेबांची मंडळीही शिर्डीस जावयास निघाली कारण शिर्डी म्हणजे त्यांचे माहेरघरच होय.

हीं एकंदर मंडळी आज दुपारीं दादर स्टेशनवरून ४ वाजता सुटणाऱ्या दिल्ली प्यासेंजरनें निघणार असल्यामुळें माझी योजना शिर्डीस नेण्या-

करिता हार व फळफळावळ मार्किटमधून दादर स्टेशनवर पोहचविण्याकडे झाली होती. त्याप्रमाणे मी नुसत्या सदऱ्या टोपीनिशीं ( कोट मिलमध्येच ठेविला होता ) हार व फळफळावर घेऊन गाडीपूर्वी १५-२० मिनिटे स्टेशनवर हजर झालों. आमचे म्यानेजरसाहेब नुकतेच स्टेशनवर येऊन त्यांच्या जाणाऱ्या एकंदर मंडळीचीं तिकिटे काढून तयार होते, परंतु ऐनवेळीं त्यांच्या वांद्राहून येणाऱ्या मंडळीपैकीं एकाचा बेत रहित झाला व एक तिकिट शिल्लक राहिलें. गाडी स्टेशनात आली, सर्व मंडळी गाडींत बसली. सर्वजणास दर्शनलाभ होणार. ते मोठे भाग्यवान आहेत मी फार अभागी आहे असा विचार मनात येऊन मी त्या जाणाऱ्या मंडळीस नमस्कार करतों आहे इतक्यात पुढील शब्द माझ्या कानीं पडले:–" पोऱ्या तूं शिर्डीस जातोस का, माझ्याकडे तिकीट शिल्लक आहे. "

हे शब्द आमच्या म्यानेजर साहेबांचे होते. ते ऐकून मला स्वतःचें भान राहिलें नाहीं. मी स्वर्गांत आहे असा भास झाला. डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले व त्या भरात माझा भाऊ घरीं अत्यावस्थ आहे या आठवणीवर जणू बाबानीं आपल्या मायेचे पूर्ण अच्छादन घातल्यामुळे मी भान न राहतां-हो,जातों. म्हणून जबाब देऊन मी गेलो असा माझ्या घरीं निरोप पाठविण्या-बद्दल आमचे म्यानेजरसाहेबास सागून त्याचे कडून परत येईपर्यंतची रजा घेऊन गाडींत बसलो व गाडी चालू झाली.

दादर स्टेशन सुटले व माझे मनावर भावाचे सीकपणाचे काळजीचे आघात सुरु झाले; ताबडतोब मातोश्रीचे शब्दांची आठवण झाली ती म्हाणाली होती कीं तूं अधिक काय करणार गूण देणार श्रीसमर्थ आहेत या वचनाचे प्रत्याघातास सुरवात झाली. काय करावें ? जावें कीं ठाण्यास उतरावें हें सुचेना. इतक्यात ठाण्याचे एक इसम गाडींत भेटले. त्यांचे पाशीं सर्व हकीगत थोडक्यांत सागून आमचे मातोश्रीकडे मी गेल्याचा निरोप पोंचविण्यास सांगितलें. व गाडी ठाणे स्टेशनांत येऊन सुटली.

इकडे ठाण्यास रात्री ८ वाजतां मी शिर्डीस गेल्याचा निरोप मातो-श्रीस समजला, तिला मी गेल्याबद्दल अत्यानंद झाला. रात्रीं तिला सुखस्वप्नें

पडूं लागली की आपल्या मुलास उद्या पासून खात्रीने गूण पडेल. कारण मी दुसरे दिवशीं शिर्डीस पोंचणार होतो. व त्याप्रमाणें झालेही. दुसऱ्या दिवसापासून आमच्या वधूस थोडथोडा आराम पडावयास सुरवत झाली.

रात्रौ २ वाजतां आमची गाडी मनमाडास पोहोचली. तेथें बदली करून दौंडमनमाड रेल्वेने दुसऱ्या दिवशीं ७-७॥ चे सुमारास कोपरगांव स्टेशनवर उतरलो व टांग्यातून कोपरगाव गावात जाऊन तेथे श्रीगोदा-माईचे स्नान करून पुढें टांग्यातून सुमारे ११ वाजता श्रीशिर्डीस पोहोचलो.

गावांतील एका वाड्यात ( बहुतकरून हा वाडा श्री. दीक्षित यांचा असावा ) आमचे बरोबरचे मंडळीने बिऱ्हाड लावलें. ( माझे स्वतःचे बिऱ्हाड म्हणजे माझे शरीर सदरा, टोपी, व नेसलेलें धोतर फक्त. ) नंतर लगेच अरतीचा वेळ झाल्यामुळे श्रीमशिदींत गेलो. श्रींची स्वारी आसनाधिष्टित असून पूजा चालू होती. यावेळीं मला आम्ही सर्व कैलासात श्री शंकराचे समोर उभे आहोंत असा भास झाला. भास नव्हेतर बाबाचे चेहऱ्यावर मी श्रीरामचंद्राचे स्वरूपाचा आरोप करून पाहू लागलों तो ते प्रत्यक्ष शंकरच आहेत असें मला जास्त खात्रीशीर वाटूं लागले असो.

माझे सोबतचे मंडळीने नेलेला हार शेरा फळफळावळ याचा श्रींनीं सहेतुक व आनंदीदृष्टीनें स्वीकार करून आरती आटपल्यावर प्रसाद व उदी घेऊन आम्हास वाड्यात जाण्यास आज्ञा झाली. त्याप्रमाणे आम्हीं गेलों.

दुपारीं २-२॥ चे सुमारास आम्ही पुन्हा बाबांचे दर्शनास मशिदींत गेलों. नमस्कार वगैरे केल्यानंतर प्रथम आमच्या म्यानेजर साहेबांचे चिरं-जीवांनीं श्रीनां ( बहुत करून १० रुपये असावेत ) दक्षणा दिली. महारा-जांनीं ते घेऊन माझे ३० तीस रुपये दे असे सांगितले. आमच्या म्यानेजर साहेबांनीं मंडळी निघाल्यानंतर त्याना खर्चास वगैरे रक्कम दिल्यानंतर कदाचित् दक्षणेकरितां म्हणून जास्त पैसा असावा म्हणून पुन्हा ३० तीस रुपये निराळे दिल्याचें समजलें. हा ठोकताळा समजल्याबरोबर माझी मनः-स्थिती काय झाली असले याचा वाचकांनींच विचार करावा.

आम्हाला श्रींनी दोन आठवडे ठेवून घेतले. हे दोन आठवडे २ दिवसाप्रमाणे निघून गेले. महाराज मजपाशीं रोज दक्षणा मागत. मला येत्या खर्चाकरिता म्हणून आमच्या म्यानेजरसाहेबांनीं दहा रुपये देऊन ठेविले होते. श्रींनीं दक्षणा मागितल्यानंतर मी त्यापैकीं १ रुपया ठेवीत असे.

एके दिवशीं महाराजांनीं मजपासीं ४ पावल्या दक्षणा मागितली. मी एक रुपया पुढे ठेविला. मला रुपया नको पावल्या पाहिजेत म्हणून सांगितले. मी रुपया घेऊन सर्व गावांत हिंडलों परंतु मला ४ पावल्या मिळेनात. शेवटीं १-१॥ तासाने एकदाच्या मिळाल्या त्या आणून श्रींचे चरणीं समर्पण केल्या.

आम्ही शिर्डीस जातो ते दर्शन घेऊन परत येतों. शिर्डी हें क्षेत्र आहे म्हणून त्या ठिकाणीं श्रींचा अवतार प्रकट झाला असे असता नुसतें दर्शन घेऊन न जाता क्षेत्राची नगर प्रदक्षणा झाली पाहिजे असा जो संत-जनाचा प्रघात त्याची अंमल बजावणी मजकडून श्रींनी करविली असी माझी खात्री झाली.

मी प्रथम लिहिल्याप्रमाणें महाराजांचें व्यापकत्व क्षणोक्षणीं गोचर होत असे. एके दिवशीं एका भक्तानें भला मोठा चिबूड महाराजांसमोर ठेविला. महाराजांकडून तावडतोब कापण्याची आज्ञा झाली व स्वत:वाटण्याची सुरवात केली. मी सर्वांचें मागें महाराजांचे दृष्टीआड मुद्दाम बसलों होतों म्हटले तरी चालेल. माझ्या पुढें बरीच गर्दी होती पण महाराजांनीं एक तुकडा इतक्या उंचीवरून व जोराने माझ्या अंगावर फेंकला कीं, माझे चागलीच तोंडांत बसली. मनांत काय समजावयाचें तें मी समजलो

एके दिवशीं आम्हीं महाराजाचे सान्निध्यांत असता माझे मनात एकाएकीं महाराज मला मारुती उपासना देतील तर बरें होईल कारण आमची परंपरा तशी आहे" असें आले. ही गोष्ट माझ्या मनांत येते न येते तोंच महाराज माझे शेजारचे मनुष्यास म्हणाले अल्ला अच्छा करेगा राम राम म्हण. मी खुणगांठ जाणली व पुढे कांही दिवसानीं ठाण्यास आमचे शेजारचे श्रीं समर्थ चौंडे महाराज याचा मुक्काम ( हे बरेच महिने.

होते रोज कीर्तन प्रवचन सुरू असे ) येऊन माझे इच्छेप्रमाणे मला श्रींचे सूचने प्रमाणे राम उपासना मिळाली व मला अत्यानंद झाला

एके दिवशीं आम्ही कांहीं मंडळी दुपारचे २ वाजण्याचे सुमारास मशिदींत बसलो होतो उन्हाळा फारच जाणवूं लागला कांहीं मंडळी वाड्यात गेली. कांहींना श्रींनीं कोठे कोठे जाण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणे कोणी श्री भागवत वाचण्यास कोणी ऐकण्यास निघून गेले.मला उष्मा सहन होत नसल्यामुळे या लॉटरींत आपणही जावें असे वाटून मी उठलो तोंच महाराज आम्हा ४।५ मंडळीस थांबवून म्हणाले तुम्ही जाऊं नका येथेंच बसा. आज्ञेप्रमाणे आम्ही ४।५ मंडळी बसलो. थोड्याच वेळात महाराजानीं आम्हास धुनीमध्यें विस्तव प्रज्वलित करण्यांस सांगितले त्याप्रमाणे आम्ही केले इतकेंच नव्हे तर आपण स्वतः आम्हास बरोबर घेऊन धुनीजवळ बसले. आम्हास केव्हां उठतों असे झाले. यज्ञाची नसली तरी श्रावणीची तरी आठवण झाली. आंगातून घामाच्या धारा चालल्या. कांहीं केल्या महाराज उठेनात व त्याचे आंगास घामाचा लेशही नाहीं हे पाहून आम्हास आश्चर्य वाटलें. घाम आल्या नंतर थोड्याच वेळात आम्हाला धुनी जवळ असताना सुद्धा थंडावा वाटूं लागला इतकेंच नव्हे तर पूर्वी होत असलेला उष्मा कमी होऊन मनास आराम व आल्हाद वाटला. तात्पर्य बराच त्रास सहन केल्या शिवाय चांगलें सुख मिळत नाहीं हे श्रींनीं आम्हांस सप्रयोग पटविले.

एके दिवशीं आरती सुरू असतांना मुंबईहून काहीं भक्त मंडळी आली त्याचे बरोबर असलेल्या एका बाईचे जिवास कांहीं पिशाच्च बाधा असे.मंडळीने बरेच उपाय करून शेवटीं त्या बाईस श्रीशिर्डीस आणले होते बाई मशीदी समोरील पटांगणांत आल्या तोंच बेशुद्ध होऊन पडल्या. साधारण गडबड झाली. परंतु आरती सुरू असल्यामुळे तिकडे फारसे कोणी लक्ष दिले नाहीं.बाई स्वस्थ पडून होत्या. पूजा आरती वगैरे आटोपून सर्वांस उदी प्रसाद समर्पण झाले. मंडळी आपआपल्या घरीं जाण्यास निघाली. तरी श्रीबाबा या बाईबद्दल अद्याप कांहीं बोलेनात शेवटीं बहुतेक सर्व मंडळी

गेली. ५।१० माणसे होती इतक्यात श्रींनीं त्या बाईना उद्देशून—अग ए उदी घेऊन वाड्यात जा—असे शब्द उच्चारले तत्क्षणींच बाई उठल्या व उदी घेऊन वाड्यात गेल्या. आम्ही तेथे असेपर्यंत या बाईचे अंगात काहीं आले नाही. पुढे २।४ दिवसानी ही मंडळी व आम्ही बरोबरच मुंबईस आलो. या मंडळीचे उपनाव मंत्री असावेसे स्मरते शक्य असल्यास आपले पुढील अनुभव त्यानीं लीलेत प्रसिद्ध करावेत.

उद्या जा,संध्याकाळीं जा म्हणतां म्हणता श्रींनीं आम्हास जवळ जवळ २ आठवड्यानीं जाण्यास परवानगी दिली. इकडे घरीं आमचे बंधूस बराच आराम पडला होता परंतु मजकडून गेल्यापासून पत्र वगैरे नसल्यामुळें आमच्या मातोश्रीस सारखी काळजी लागली होती. रात्रौ झोप येईना. शेवटीं एका रात्रीं पहाटेस स्वप्नात एक फकीर आला व त्याने एक पत्र दिलें त्यात काहीं काळजीं करूं नको तुझा मुलगा सकाळीं परत येइल असा मजकूर होता. हे स्वप्न जागेपणींच पडलें म्हटले तरी चालेल. कारण तिनें लगेच माझ्या धाकट्या बंधूंस ही गोष्ट सागितली व त्याला पत्र देण्याकरितां हात पुढे केला तों पत्र नाहीं. तेव्हा हे स्वप्न ठरून मंडळीला हसूं आले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी येऊन दाखल झालो. सर्वांस उदीप्रसाद दिला. आनंदी-आनंद झाला. तिथपासून माझा नेहमींचा सिकपणाही कमी झाला. आमचे घरीं श्रींचे रामस्वरूपीं ध्यान होऊन ( कारण हीच उपासना पूर्वीपासून सुरू असल्यामुळे—साईरूप धर राघवउत्तम॥ भक्तकाम विबुध द्रुम प्रभुं॥ ही भावना दृढ झाली ) पूजा सुरू झाली व कमजास्त प्रसंगीं उदी देण्याचा प्रघात सुरू झाला. त्यापैकीं एक अनुभव देऊन आज रजा घेतो.

आमचे शेजारीं रा. दादा खोत या नावांचे एक मूर्तिकार रहात असत. श्री गजाननाच्या मूर्ति करण्यांत अद्याप त्यांचा हातखंडा असे. त्यांच्या मागे तशा मूर्ति झालेल्या पहाण्यांत नाहींत. यांचा मुलगा घनःशाम यांस प्रथम ताप येत असे. प्रथम खासगी औषधें केलीं ताप जाईना. शेजारीं हल्लीचे प्रसिद्ध भागवत डॉक्टर राहात असत

(त्यावेळी हे डॉक्टर नव्हते) त्यांनीं काहीं औषधयोजना करून पाहिले. गूण नाहीं. थोड थोडा खोकला येऊ लागला नंतर मला वाटते डॉ. वेल्स याना प्रकृती दाखविली असता त्यांनी थोडे दिवस औषधोपचार करून पाहून गूण नसल्यामुळे हवा पालट करण्यासाठी नाशीकसारख्या ठिकाणी जाण्याचा सल्ला दिला. परंतु हे काम जास्त खर्चाचे असल्यामुळे रा. खोताचे ऐपती बाहेरचे होते. दुसऱ्या दिवशीं रात्रौ आमचेकडे आरती चालली असताना रा. खोत आले व म्हणाले आमचे बाबूस क्षयरोग झाल्याचे डॉ म्हणतात आतां मी गरीब माणसाने काय करावे, मीं म्हटले निष्ठा असल्यास श्रींची उदी घेऊन जा थोडी पोटात घ्या व झोपतेवेळीं उशास ठेवा. त्याप्रमाणे त्यानीं उदी देण्यास सुरवात केली ८ दिवसात ताप बंद झाला.पुढे खोकला औषधा शिवाय साफ गेला व एक महिन्यात प्रकृती साफ बरी झाली. पुढें वरील डॉ. वेल्सना प्रकृती दाखविता प्रकृति साफ झाली घाबरण्याचे मुळींच कारण नाहीं व औषध योग्य पोचल्याचें सांगितले. याप्रमाणे शेकडो अनुभव येत आहेत ते सवडीप्रमाणे मागाहून पाठवीन लेखन सराव नसल्यामुळे लिहिण्यात बऱ्याच चुका झाल्या असतील त्या सुधारून घ्याव्या क०.

आपला नम्र,

**गणेश गोपाळ महाजन**

सामंतांची वाडी ठाणे.

## रा. रा. विनायक शंकर गिरिधर यांचा श्रीसाईबाबांबद्दल अनुभव.

### श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

श्री साईबाबाबद्दल माझ्या अनुभवास आपल्या मासिकांत स्थळ मिळण्यास विनंति आहे.

सन १९१२ साली माझी बदली आंधेरी नजीक गुंदवलीस झाली. मी तलाठ्याचें काम करीत असतों. मी आंधेरी येथे रा. मुकुंद सदाशिव पाटील याच्या देवळानजीकचे चाळींत राहत होतों. आंधेरी येथे आल्यानंतर थोडया दिवसांनीं आंधेरीचे स्टांपवेंडर रा. रामचंद्र सिताराम देव याची ओळख झाली पुढे त्याच्या येथें नेहमीं जाणे येणें होत असे. त्यांनीं मजला शिर्डी येथील समर्थाकडे जाऊन त्यांचे दर्शन घेण्यास सांगितलें. त्यावरून महाराजाकडे शिमग्याचे महिन्यांत पहिल्यानें दर्शनास गेलों. मग तेथून तीन दिवसानीं दर्शन घेऊन परत आलो. पुढे तीन महिन्यानीं म्हणजे आषाढ महिन्यात फार पाऊस पडून जेथे तेथे पाणीच पाणी भरून राहिलें होतें. मी राहत होतों त्या चाळीचे मावळत बाजूला किराण्याचे दुकान होते. त्याचे मागचे बाजूस घराचा पाया घालण्याकरिता सुमारे सहा फूट खोलीचा व दोन फूट रुंदीचा चर खणलेला होता. तो चर पाण्यानें भरून मागील परसांत पाणी जमल्यामुळें दिसेनासा झाला होता. एके दिवशीं संध्याकाळीं माझा मुलगा पाऊस पडत असतां छत्री घेऊन पाणी जमलें होतें त्यात फिरूं लागला. त्यावेळीं त्याचे वय केवळ तीन वर्षांचे होतें. फिरतां फिरतां तो त्या चरांत पडला. तो आंगांतील कपडयासह व डोकींतली टोपी व हातांतील छत्रीसह आंत पडला. त्यावेळीं आसपास तेथें कोणी नव्हतें. त्यानंतर थोडया वेळानें त्याची आई शौच्यास गेली होती ती परत आली असतां मुलगा कोठें आहे म्हणून तपास करूं लागली. तों हा त्या चरांतून चढून बाहेर येत असतांना तिनें पाहिलें. मी घरांत नव्हतों व बाहेरून आल्यानंतर मला समजलें तेव्हां मी मागले द्वारीं येऊन पाहातों तों त्याचे आंगावरील कपडे व टोपी भिजून गेली आहे व हा त्या चरांतून बाहेर

आल्याचे समजले. मी त्याला विचारिले तूं त्यातून चढून कसा आलास? तो म्हणाला चढण्याकरिता कोनाडे व पायऱ्या केल्या आहेत त्या चढून वर आलों. त्या घरांत छत्री राहिली. होती ती वर काढून घेतली थोडया वेळाने त्या ठिकाणीं ही हकीगत समजल्यावरून मंडळी जमली. त्यांनीं हा मुलगा स्वतः वर आल्याचे समजल्यावर सर्वांस आश्चर्य वाटले ही गोष्ट घडण्यापूर्वी एक दिवसांवर 'हा निजलेला असोन आम्ही उभयता शोक करीत आहों' असे समर्थांनीं स्वप्नात सूचित केले होते. तेव्हापासून महाराजावर जास्त भक्ती जडली व शिरडीस कधीं जाणे झाले असता समर्थांकरिता माझ्या कुटुंबाने हार गुंफून घ्यावा.

एकदा समर्थांच्या दर्शनास रा. रा. रामचंद्र सिताराम देव, गणेश पांडुरंग बेद्रे व मी असें मिळून आम्ही शिरडीस गेलो होतो. जाताना समर्थांकरितां माझ्या कुटुंबानें साईबाबाकरिता गुलाबाचे फुलांचा हार गुंफून दिला होता तो शिरडीस बाबाचे दर्शन घेण्याचे वेळीं गळ्यांत घातला. त्यावेळीं समर्थ म्हणाले 'हा माझ्या प्रेमाचा हार आहे' तो हार समर्थांनीं बराच वेळ ठेविला होता. दुसरे लोकही दर्शनास आलेले होते. त्यानीं घातलेले हार ताबडतोब काढून टाकीत असत. त्याच रात्रीं इकडे आंधेरीस माझ्या कुटुंबास स्वप्नात येऊन सागितले कीं 'मला हा हार घातला होता हा प्रेमाचा होता व असाच मला आनदानें वारंवार घालीत जा.'

आम्ही एकदां बेद्रे मास्तर रामचंद्र सिताराम व मी असे तिघेजण मुलांसह बाबांच्या दर्शनाकरिता शिरडीस गेलो होतों. समर्थांचे दर्शन घेतेवेळीं श्रीचे चरणावर मुलाला घातला त्यावेळीं मी मनात म्हणालों, 'बाबा, हा तुमचा आहे; याचा संभाळ तुम्ही करावा' पुढें आठ वर्षांनीं म्हणजे सन १९२२ सालीं जुलई महिन्यांत माझी बदली डहाणू तालुक्याहून वांद्रे येथें झाली. त्यावेळीं वांद्र्यास मी बिऱ्हाड केले नव्हते. मुलाला व बायकोला आजोळास आगाशी येथे ठेविलें व मी एकटाच वांद्र्यास होतों. इकडे सुमारें पंधरा दिवसांनीं श्रावण महिन्यां मुलाला प्लेग झाला, ताप आल्या-

वेळीं लागलेंच मला वाद्र्यास माझ्या मेहुण्यानें येऊन कळविलें. मी तसाच आगाशीस गेलो व पहातों तो त्यास तापामुळें शुद्धि नव्हती. वायू होऊन वडवड करीत होता. पुढे ईश्वरी बोवडी पडली होती. डाव्या जांघेत दुखूं लागले व अरनाळकर डाक्टर रा. रा. दिनकर जगन्नाथ गाळवणकर यांचें औषध सुरू केलें होते. ही केस वाटावणें फार कठीण होतें. रोज मनांत ईश्वराचा व बाबाचा धावा करीत होतो. इतकी जरी स्थिति होती तरी दुखण्यात त्याने श्री साईबाबाचा फोटो उशाजवळ ठेवला होता व बाबांस म्हणत असे 'मजला लवकर बरें करा, मी समाधीचे दर्शन घेईन' व बाबांची उदी सकाळ संध्याकाळ रोज घेत असे. असे भयंकर संकट आलें होतें व यांतून समर्थांनीं पार पाडलें. पहिले तीन दिवस ही केस हातात येईल असे डाक्टरांसही वाटत नव्हतें. अकरावे दिवशीं रोजच्याप्रमाणें डाक्टरनें इंजेक्शन केल्यानंतर आम्हां सर्वांस सांगितलें कीं 'काहीं भिऊ नको बरा होईल' अशी इंजेक्शनें दिवसातून दोन वेळ कांहीं दिवस केलीं. नंतर ताप निघून गांठ फुटून बरी झाली. समर्थांची लीला अगाध आहे. त्यांची कृपा सर्व भक्तावर सारखीच असते.

तसेंच ही गोष्ट घडण्यापूर्वी एक वर्ष आधीं मी आगाशीस असताना माझे कुटुंब न्यूमोनियाचे तापानें फारच सीक झाले. त्यावेळीं तिची सावत्र आई व दोन लहान भावंडें अशीं तीन मनुष्यें चार दिवसांत गेलीं. नंतर तिची चुलती त्याच तापाने सीक होऊन पांचसहा दिवसांनीं तीही गेली. परंतु समर्थांच्या कृपेनें डॉक्टर दिनकरराव गाळवणकर यांच्या मेहनतीला यश आले. दुखण्यांत असताना 'बाबांनीं प्रत्यक्ष दत्ताचे रूपानें येऊन माझे वडील भावजयीचे ओटींत हिंग घातलें' असा दृष्टांत म्हणजे प्रत्यक्ष तिला असा भास झाला. व त्या दिवसापासून दुखण्याचें मान कमी झालें. नंतर ताप निघून बऱ्याच दिवसांनीं ती बरी झाली. असे समर्थांचे अनुभव नेहमी येतात.

समर्थांनीं समाधी घेण्याचे पूर्वीं माझ्या कुटुंबाला स्वप्नांत येऊन सांगितलें कीं 'मुलाला स्नान दुरून घाल' परंतु आम्हांस याचा अर्थ

कांहींच समजला नाहीं त्यावेळीं आम्ही मनोरीं गावीं होतो. पुढें तेथून एके दिवशीं वाद्र्यास जाऊन आल्यानंतर समजलें की—दसऱ्याचे दिवशीं समर्थांनीं समाधी घेतली. तेव्हा त्याच्या दृष्टांताचें कौतुक वाटलें. महाराजाचे अनुभव अद्यापिही पुष्कळ येत आहेत; त्यातील मुख्य मुख्य ज्याची आठवण झाली ते समर्थांच्या प्रेरणेने पाठविले आहेत

आपला

**विनायक शंकर गिरधर, मु॥ मालाड.**

## श्री. सद्गुरू साईनाथ

रा. रा. जनार्दन मोरेश्वर फणसे ऊर्फ हरीभाऊ फणसे डहाणूकर यांचा अनुभव. यांस बाबांनीं बाबुल्सार असें म्हटलें आहे.

एक बाबाचें लेंकरूं त्यांचे हुकुमाने बरळत आहे.

मी एक अगदीं गरीब स्थितींतील माणूस असल्यामुळें व कुटुंबाचा बोजा जास्त माझेवर अवलंबून असल्यामुळे अतिशय त्रस्त होऊन रामेश्वरास जाण्यास घरून आईची आज्ञा घेऊन निघालों. परंतु जातांना संत लोकांचीं जितकीं दर्शनें मिळतील तितकीं घ्यावीं अशी इच्छा पूर्व सुकृतानें झाली गेली व त्याप्रमाणें सध्यां सत्पुरूष शिर्डी येथे अवतरले आहेत असें कळलें. तों शिर्डीसच गेलों. समर्थांचें दर्शन होतांच काहीं दक्षिणा मला दे व मला ब्राह्मणाला संतुष्ट केल्याशिवाय तुला रामेश्वरची यात्रा सफल होणार नाहीं असें म्हणाले. त्यावेळींच माझे मनाचा निश्चय झाला कीं, ओ हो. यांचे पुढें यात्रा ती काय जास्त आहे ? हा निश्चय होतांच महाराजांनीं रामेश्वरास जाण्या येण्यास फक्त रेल्वे चार्ज पडेल तो आंकडा मागितला. हा आंकडा मग मी हिशोब केला तेव्हां समजला. (त्यांचे तोंडचे वाक्याप्रमाणें रुपये मोजून दिले. रुपये हातांत पडतांच बाबा म्हणाले कीं तुला आता कोठलेही यात्रेस जाण्याची जरूर नाहीं. मी भीत भीत म्हटलें कीं

मला जर इकडेच रामेश्वर दिसला तर जास्त प्रवासाची जरूर काय ? कारण ही श्रद्धा बसण्याचे कारण ती मूर्ति पाहताच मला असें वाटलें कीं, हा माझा आजोबा कीं पंजोबा आहे. अनेक वेळ पाहिलेला दिसतो व पुष्कळ वेळ ह्यांच्या नाझ्या बैठकी व सदुपदेश जाहला आहे. असे ज्ञान भासलें. मी रजा ६ महिन्याची विनपगारी घेतल्यामुळे बरेच दिवस इकडे रहावे अशा बेताने सेवा करीत होतों. सात दिवस सेवा झाल्यावर सकाळीं दर्शनास जाता क्षणीं कळविले कीं भाऊ घरीं जा, रामेश्वर तूं घरीं आल्यापासून उपाशी आहे. जा नाहींतर रामेश्वर न होता भद्रेश्वर होईल. ७ दिवसांत तिकडे दिवसा शिर्डी व रात्रीं झोंपेत रामेश्वर अशा आनंदांत असल्यामुळें मी त्या वाक्यावर विश्वास ठेऊन घरीं आलों व पाहतो तों मातोश्रीनें मी गेल्यापासून संतापाने अन्न वर्ज्य केले होते व मनाचा असा निर्धार केला होता कीं हा खरा साधू असेल तर माझे मुलाचा निश्चय बदलून त्याला सात दिवसाचे आंत डहाणूला परत पाठवील. नाहीं पेक्षा मी ७ दिवस उपास करून ८ वे दिवशीं दूध मात्र घेईन व मुलगा जेव्हां परत येईल तेव्हांच अन्न घेईन. असो.

'आपणा सारीखे करीती तात्काळ " काशी स्नान जप प्रति दिवशीं निद्रामाहुर देशीं " या वाक्याप्रमाणें मला प्रत्यक्ष अनुभव दाखविला.

इकडे ह्याची गादी स्थापन आहे म्हणजे पादुका, कफनी, रुमाल, असें सामान बाबा दिल्यावर सांगितले कीं मी तुझ्याबरोबर येतों. इकडे हे लोक मला फार त्रास देतात. तेव्हा मी सांगितले चला. तेव्हां महाराज म्हणाले सर्व ठिकाणीं मी पूर्ण भरलेला आहे. जे डोळ्यानें दिसेल तें सर्व मिळून मी आहें. माझें येणे जाणें नाहीं. 'मी' हालत, अगर चालत नाहीं. आपण चांगलें करून अल्लाला द्यावे म्हणजे चांगलेच होईल, चांगलें करील त्याचेच मालक अल्ला आहेत. वाईट करतात व चांगलें माझे जवळ मागतात मी कोठून देऊं ? नंतर जातांना सांगितले कीं ७ दिवस उपास केलेस तरी भूक लागणार नाहीं. त्याप्रमाणें मी घरीं जातांच ७ दिवस उपास करने

असा मनात विचार येऊन राहिलो. त्या वेळीं मी उत्तर काढले कीं ज्या आईला उपास पडले तो उपास माझ्या करितां तेवढे मला देवाने पाडले परंतु तसें नाहीं. ७ दिवस मी एकातामध्यें बसलो असता मध्यंतरी ८ उपास होतांच २ तास बेसावध रीतीनें झोप लागली ती दुपारीं १२ वाजल्यापासून ३ वाजे पर्यंत त्या वेळात ज्योतिषाच्या आधारे मृत्यूची वेळ होती ती टळली; व मी आपले टिपण ( पत्रिका ) जाळून टाकली व जो इतके साभाळणार आहे त्यापुढे ज्योतिष काय आणि कर्म काय ? कारण बाबांनी सागितले कीं कोणतेंही चांगले काम करीत असावे पुढें अल्ला मालीक आहे. त्याच्या हुकमाशिवाय झाडाचे पान देखील हालत नाहीं.

एका वेळीं असें झालें कीं एक कॉलऱ्याची केस होती. कॉलेरा झालेल्या माणसास माझेजवळ बाबांची उदी शिल्लक असलेली पाण्यांत टाकून पिण्यास दिली. तो इसम सुधारला. त्यामुळे त्या गांवीं मी चांगला वैद्य आहें अशी लोकांची खात्री जाहली. मला विचार पडला कीं, देवा उदीतर संपली आतां कसें होईल ? परंतु त्या दिवसापासून त्या गांवचा कॉलराच नाहींसा झाला परंतु मी वैद्य चागला हें मात्र शिल्लक राहिलें. नंतर भोपोली गांवीं एक मारवाडी राहात असे. त्याचा भाऊ सीक जाहला. त्यास कुढाणच्या संस्थानिक सरकारी डाक्टरचे औषध चालू होते. त्यास गुण न येता त्याची तबीयत जास्तच जाहली व तो व त्याचा भाऊ गाडींत बसून डाक्टरांना आणण्यास गेला. परतु डाक्टर आदल्या दिवशींच रजेवर निघून गेल्यामुळे तो निराश होऊन घरीं परत आला. इतक्यात माझा मुक्काम त्याचे घरीं गेला. त्या इसमांनीं मला पाहतांच म्हटले कीं, तुम्ही प्रत्यक्ष बाबाना इकडे आणून भजन-पूजन करता तर मग ह्या माझ्या भावाला औषध देऊन चांगला कराल तर-बाबा खरे असे मी म्हणेन, नाहीं तर तो साई लुच्चा आहे असें समजेन. त्यावेळीं मी त्या इसमाची तबीयत पाहिली. पाहिल्याबरोबर इकडे आपण राहूं नये असें वाटलें परंतु रात्र झाल्यामुळें तिकडे राहणें भाग आले. नंतर जेवणखाण

आटपून भजन म्हणत असल्यावेळीं त्या इसमानें नारळ, तुपाचा दिवा, खडीसाखर, उदबत्ती. वगैरे सामान बाबांच्या फोटोजवळ ठेविलें. तेव्हां माझ्या मनात आलें कीं, हा जर मनुष्य सीक आहे, उठणे बसणे बंद पडले होते, शुद्धीही अजून नसून होती. अशा स्थितींत ह्या इसमाने सामान आणलें व त्यास नलाच देऊन भजन संपेपर्यंत फोटोकडे ध्यान लावून स्वस्थ भजन ऐकत बसला तर ठीक झाले. नंतर मला निजतांना म्हणाला माझा भाऊ मेला तरी हरकत नाहीं परंतु तुमचे औषध घेणार. मी रोगाच्या बाबतींत परिक्षक नसून औषधाची मला माहितीहीं नाहीं हे जर खरें आहे तर मी ह्यास काय औषध देणार ! असो. सद्गुरूची मर्जी असे म्हणून निजलो आणि सकाळीं औषध मागितल्यास काय करावे ह्या विचारानें निजलों. झोंप लागतांच बाबानीं स्वप्नांत सांगितलें कीं, काय भाऊ तूं जर वैद्य म्हणवीत नाहींस तर तुला युक्ति सांगतो. हा अमूक रोग आहे. ह्या रोगास अमुक औषध दे म्हणजे तो बरा होईल. सकाळीं समक्ष दिसोन आलें रोगी पुष्कळसा बरा जाहला परंतु त्याने सांगितले कीं ( तुमचे ) गुरूने आज मला कळविलें कीं ह्याचेजवळ औषध घे, तुझ्या भावास हा बरा करील. तेव्हां तुम्हीं मला राख द्या मी ती २०० रुपये फी घेणार डॉक्टरपेक्षां जास्त विश्वासानें माझ्या भावास देईन व तो बरा होईल, अशी माझी पूर्ण खात्री आहे. त्यावेळीं त्या सांगितलेल्या औषधाचा तपास करून तें त्यास दिले. व तो त्याप्रमाणें चांगला झाला. तेव्हां मी ह्यात कांहीं केलेच नाहीं. सदर माणसास पंडुरोग झाला होता असे समर्थांचे म्हणणे होतें. त्याबद्दल मी पैसे किंवा कोणताही मोबदला घेणार नाहीं असें त्यांस स्पष्ट सांगून निघून गेलों. परंतु त्या इसमास फार वाईट वाटून त्याने आमचे बिऱ्हाडीं मी हजर नसल्यावेळीं जरीचा फेटा आणून दिला. मला ही गोष्ट समजताच त्याची किंमत काय असावी असा तपास करून तो ज्या किंमतीचा असेल ती किंमत समर्थांस पाठवून मग विकत घेतल्याप्रमाणे तो वापरण्यास हरकत नाहीं असें ठरविले. त्याची किंमत माझ्याजवळ सवड नसल्यामुळें तो रुमाल मी पेटींत ठेविला. इतके अवकाशांत समर्थांनीं आपला अवतार संपविल्याचें

पत्र मिळाल्यावर मी फार दिलगिर जाहलो व गुरुवारी भजनास बसलो असताना फार वाईट वाटून डोळयात पाणी येऊन बरेच असमाधान जाहले. नंतर निजल्यावर साक्षात्कार समक्ष सांगितले कीं दुष्काळ आहे तर हे रुपये व दुसरे तुजपाशीं असलेले रुपये मिळून तांदूळ आणून तोटयाचा धंदा कर. त्यात ते सर्व रुपये संपेपर्यंत तोटयाने धंदा कर व नंतर तोच धंदा नफ्याने कर म्हणजे तुझी गुजरण होईल. मग दुसऱ्याची नोकरी करणे नको. अल्ला मालीक आहे. तो सर्व जगाचे अपराध पोटात घालणारा असोन सर्वांस समजत आहे. बरं-वाईट त्याला सर्व काहीं दिसते व समजते. तू काळजी करू नको. तुझे बरोबर मी आहे. तूं मजवर जितका भार टाकशील तितका मी घेण्यास खबरदार आहे. व तूं घेशील तेवढा तुजवर आहे. असे तूं मानशील तरी सुद्धा मी तुजवर पडूं देणार नाहीं. त्याप्रमाणे मी त्याच्यावर भार घालून धान्याचे दुकान चालूं ठेविले आहे. आज दुष्काळाचे सालीं ५० साठ हजार रुपयाची उलथापालथ सद्गुरूनीं केली व त्यामुळे १० वीस हजार रुपयाचा धंदा मी त्या भरंवशावर सहज करीत आहे. म्हणजे ते मजपासून करून घेत आहेत. सदरहू अवतार देवाचा उपअवतार होऊन गेला. पूर्वीं गाणगापूर येथे नरसिंह-सरस्वतीचा अवतार जाहला तसाच हा अवतार प्रत्यक्ष भगवान होते असे माझ्या मतें सातजन्म मागेल ज्ञानावरून स्पष्ट झाले. असो. थोडेसेंच लिहून पुरें करितो. कारण ह्या कामाची जलदी फार आहे. पुढे मागे कोणी असाच श्रींचा भक्त कोणी ग्रंथास माहिती मागेल त्यास पुढें देता येईल. कळावे, लोभ असावा हे विनंती.

सद्गुरूच्या चरणारविंदींचा

**एक पदरजकण**

॥ श्री गुरुदेव ॥

## ॥ भूपाळी ॥

ऊठ ऊठ सुखधामा आतां गुरुबाबासाई ॥
सुखद दर्शना देऊनि सारें अघ विलया नेई ॥ १ ॥
माया तिमिरी घोरत पडले जन अवघे नाथा ॥
कृपा दृष्टिनें न्याहळी त्यानां ऊठ त्वरें आतां ॥ २ ॥
धर्माचें तें मूळ करपलें कुकल्पना ज्वाळी ॥
बोधामृत तव सिंचन करूनि त्यातें प्रतिपाळी ॥ ३ ॥
साह्य तुला करण्यास उभा हा संतांचा मेळा ॥
नारद तुंबर शुकसनकादिक दावी मुखकमला ॥ ४ ॥
आदिनाथ मछिंदर गोरख जालंदरनाथ ॥
कानिफ गुप्तेशासह आले श्री गहिनीनाथ ॥ ५ ॥
ज्ञान पीयूषा पाजुनि सुखमय जन अवघे केले ॥
निवृत्ति सोपानासह भगवान ज्ञानराज आले ॥ ६ ॥
ब्रह्मरूपही माया झाली श्री मुक्ताबाई ॥
सिद्धवटेश्वर चांगा झाला लीन जिचे पायीं ॥ ७ ॥
द्वारिं उभा जोहार करी तुज चोखा संतमणी ॥
गोरोबा सांवता सेना आले ऊठ झणीं ॥ ८ ॥
ज्याचें प्रेमळ गाणें पडलें विश्वेठकांठकतें ॥
नामदेव हे आले लोटीं निद्रेला परतें ॥ ९ ॥
भक्तिबळानें प्रभुला ज्यांनी स्वगृही राबविलें ॥
जनार्दनाचे एकनाथ हे तुज बहाण्या आले ॥ १० ॥
अखिल जगाला भूषण जो कां मारुति अवतार ॥
छत्रपति शिवबासह आला समर्थ दातार ॥ ११ ॥
अभंग वाचे भजन करुनियां आळवीत तुजला ॥
तुकाराम महाराज उभे हे ऊठ झणीं विमला ॥ १२ ॥
गंगा गोदा रेवा यांचें निर्मळसें पाणी ॥
मुख मार्जन तुज करण्या नाथा संत सखू आणी ॥ १३ ॥
नानापरिचे बालभोग ते घेऊनियां हातां ॥
मिराबाई ही आली आतां ऊठ दयावंता ॥ १४ ॥

भक्तोद्धरणा ज्यांचा सदा वेशी अवतार ॥
फर्थार आले रामनामिचें घेऊनियां चीर ॥ १५ ॥

चित्ते मथुनियां प्रगट ज्यांच्या व्यंकटेश झाले ॥
सैलूचे सत्परमगुरु "गोपालनाथ" आले ॥ १६ ॥

गंगागिर गोसावी वाही प्रेमे तुजलागी ॥
पलुसकर धोंडिबा आले ऊठ ऊठ वेगी ॥ १७ ॥

ऐक्यपणी तव स्वरूप सांवळे ज्यानी दावियलें ॥
चित्रकूटीचे नाथ दयाळा माधवजी आले ॥ १८ ॥

रसना ज्यांची नामीं रतली नाथा दिनराती ॥
रामबाई ओवाळीत घेऊनि काकडा हाती ॥ १९ ॥

"राधाकृष्णा" होऊनि आंगण झाडी जनाबाई ॥
तन मन धन तें अर्पण करुनि प्रेमें तव पायीं ॥ २० ॥

परिवार तुझा "काका" "नाना" घेऊनि समवेत ॥
म्हाळसापति आले ज्यांचा तवचरणी हेत ॥ २१ ॥

भक्ति प्रेमे गाऊनि ज्यानें आकळिले प्रभुला ॥
संत कुळीचा भाट तुझा हा "दास गणू" आला ॥ २२ ॥

खंजरी घेऊनि हातीं "भगत" करि नर्तन प्रेमानें ॥
पचप्राणें निंबलोण करी "बाळ" तुझें तान्हें ॥ २३ ॥

श्री साईबाबांच्या एका भक्ताकडून

## संक्रांतीचा तिळगुळ.

### श्री साईबाबांना अर्पण

(चाल:—"आनंदाचा कंद हरी हा.)

तिळगुळ जैसा साखर गुळ हा मिश्रण करूनी बनवीतो,
तैशी भक्ति हा तिळ म्हणून प्रेमरसाची साखर ती ॥ धृ० ॥
मिश्रण ह्यांचें करूनी आपण अर्पण करुंया साईनां,
प्रेमानंदें स्वीकारा हें विनवी असे मी बाबांना ॥ १ ॥

आपणास बाबाकडून तिळगुळाचा प्रसाद

( अजर्नी गीत )

पूर्ण कृपाही तीळ घेऊनी,
ज्ञान रसाची साखर घालुनी,
मिश्रण यांचें आपण करुनी,
तिळगुळ मागूं हा ॥ १ ॥

मिळतां सार्थक होईल साचें
पूर्णाशा अशी मी मनिं करितें
अल्पमति मी तिळगुळ लिहितें
प्रेमे स्वीकारा ॥ २ ॥

## ॥ श्री उद्धवेश बुवांचें पद ॥

पद—चाल—साध्य नसे मुनि कन्या.

वंदन साई पदाला ॥
    तारक होवो सकल जगाला ॥ धृ० ॥

भालीं त्रिपुंड्र गंधहि साजे ॥
शुभ्र वस्त्रही शिरीं विराजे ॥
गौरांकित तनु ऐशा
    ध्यातां धांवत तारी त्याला ॥ वंद० ॥ १ ॥
नानापरि तूं बोधिसि दाता
काम मदादिक षड्रिपु हर्ता ॥
तो गुरु शामासी हो ज्ञाता ॥
    लागा भजनीं विनवी तुम्हाला ॥ वंद० ॥ २ ॥

## श्री उद्धवेश बुवांचा हलवा

चला चलारे हलवा करुं या ज्ञानाचा सत्वरी ॥
अर्पूया श्री गुरु चरणावरी ॥ १ ॥
ज्ञानाग्नीची परात विस्तृत ठेवुनियां त्यावरी ॥
भक्तिचे तिळ घालूं भीतरी ॥ २ ॥

१ गोरें. २ श्री उद्धवेश.

आनंदाचा रंग केसरी मधुनि मधुनियां दिला ॥
आतां तो खुलेल बहु चांगला ॥ ३ ॥
सद्बोधाचें खड्गतेंचि जें वेळा जायफळादी ॥
कामक्रोध हे येतां जवळी दग्धचि होती समुळ अधी ॥ ४ ॥
सांइसुत जो रामदास हा हलवा करवी जरी ॥
गुरुरायाचा प्रसाद म्हणुनी तिळगूळ देत करी ॥ ५ ॥

## आत्मबोध–जन्मोत्सव अंक.

येत्या ध्वजारोपणाचे दिवशीं म्हणजे **श्रीनाथ**महाराजाच्या जन्मोत्सवाचे दिवशीं ( ता. १३–४–२६ रोजीं ) प्रसिद्ध होईल. सदर अंकात **श्रीनाथां**च्या समकालीन ब्रह्मीभूत व विद्यमान विभूति श्रीशीलनाथ महाराज श्रीपरमहंसमहाराज नासिक, श्री धोंडीबुवामहाराज पलुसकर, श्रीसाईनाथमहाराज, श्रीगोविंद महाराज सोनगीर, श्रीउपासनीमहाराज साकोरी इत्यादिकांचीं फोटोसह त्रोटक चरित्रे देण्याचा आमचा विचार आहे. आतापर्यंत खालील लेखकांनीं लेखांचे अभिवचन दिले आहे व कांहींचे लेख आलेही आहेत.

कै. रा. ब. जस्टिस कीर्तने ( अवतार रहस्य ), श्रीमंत सरदार किबेसाहेब, श्री. चिं. वैद्य, श्री. स. बा. हुदलीकर, श्री. वाकणकर, श्रीमत सौ. कमलाबाई साहेब किबे इ. ”

हें कार्य अतिशय खर्चाचें आहे. हल्लींच्या अंकापेक्षां जवळ जवळ दुप्पट पानें, सुंदर, गुळगुळीत, जाड, देशी कागद व निरनिराळ्या शाईंत फोटो इतकें असून तो वर्गणीदारांस मिळेल. वार्षिक वर्गणी ट. ख. सह तीन रुपये, व्ही. पी. खर्च निराळा. तरी नवीन होणाऱ्या वर्गणीदारांनीं अशी संधि घालवूं नये. इतरांस फक्त हाच **फुटकळ अंक १२ आणे,** ट. ख. ४ आणे. चालू वर्षी जाहिराती घ्याव्यात असें मंडळाने ठरविल्यामुळें जाहिरात देणारांनी त्वरा करावी. आत्मबोधाचा खप शहरापासून तों अगदीं लहान खेडयांतही असल्यामुळें प्रसिद्धीचें कार्य अगदीं अल्प वेतनांत होईल. जाहिरातीचे दर समक्ष अथवा पत्रद्वारें.

– **चिटणीसः**—श्रीनाथकार्य–प्रवर्तक–मंडळ, सरस्वती–निकेतन,
इंदूर छावणी.

## अध्याय ३७ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

धन्य धन्य साईचें चरित ॥ धन्य तयाचें नित्याचरित ॥
क्रियाही अकळ अत्यद्भूत । इत्थंभूत अकथ्य ॥ १ ॥

अगाध त्याचें सच्चरित । धन्य तयाचें जीवनवृत्त ॥
धन्य धन्य तें अप्रतिहत । असिधाराव्रत तयाचें ॥ २ ॥

कधीं ब्रम्हानंदें उन्मत्त । कधीं ते निजबोधें तृप्त ॥
कधीं सर्व करूनि अलिप्त । ऐसी अनिश्चित ती स्थिति ॥ ३ ॥

कधीं सर्व प्रवृत्ति शून्य । तरी तो नव्हे निद्रासंपन्न ॥
निजस्वार्थीं ठेवूनि मन । सदा सावधान निजरूपीं ॥ ४ ॥

कधीं सागरसम प्रसन्न । परी तो दुरंत दुर्विगाह्य गहन ।
कोणा हें अगाधरूप निरूपण । यथार्थपणें करवेल ॥ ५ ॥

पुरुषांसवें धरी बंधुता । स्त्रिया तयाच्या बहिणी माता ॥
ब्रह्मचारी ऊर्ध्वरेता । ठावा समस्तां सर्वदा ॥ ६ ॥

ऐसियाचे सत्संगतीं । प्राप्त झाली जी मती ॥
तीच राहो निश्चल स्थिती । निधनप्राप्ती पर्यंत ॥ ७ ॥

उदंड व्हावी सेवावृत्ति । चरणीं जडावी अनन्य भक्ति ॥
भगवद्भाव सर्वां भूतीं । अखंड प्रीति तन्नामीं ॥ ८ ॥

पाहोनि त्याच्या एकैक कृती । जे जे कारण शोधूं जाती ॥
ते ते कुंठित होउनि अंतीं । स्वस्थचि बैसती तटस्थ ॥ ९ ॥

कितिएक स्वर्गसौख्या झगडती । मानिती अत्यंत स्वर्गाची महती ॥
ते भूलोका तुच्छ मानिती । मरणाची भीति म्हणती इथें ॥ १० ॥
परी अव्यक्तांतून आकारा येती । तियेसचि म्हणती व्यक्त स्थिती ॥
पुढें तीच प्रवेशतां अव्यक्तीं । मृत्यू म्हणती तियेस ॥ ११ ॥
अधर्म अज्ञान राग द्वेष । इत्यादिक हे मृत्युपाश ॥
यांचे उल्लंघन करी जो अशेष । त्यासींच प्रवेश स्वर्लोकीं ॥ १२ ॥

स्वर्ग स्वर्ग तो काय आणिक । वैराज तोच स्वर्ग लोक ॥
विराट आत्मस्वरूप देख । मानस दुःख विवर्जित ॥ १३ ॥

जेथें नाहीं रोगादि निमित्त । नाहीं चिंता व्याधी दुःख ॥
जेथें न क्षुधा तृषाकुलित । कोणी न व्यथित जराभयें ॥ १४ ॥

जेथें नाहीं मृत्यु भय । नाहीं विधिनिषेध द्वय ॥
जीव वावरे अत्यंत निर्भय । तीच कीं दिव्य स्वर्गस्थिति ॥ १५ ॥

जें आब्रह्मस्थावरांत । पूर्ण स्थावर जंगमांत ॥
तेंच तत्त्व परत्रीं वा येथ । नानात्वविरहित तेंच तें ॥ १६ ॥

असतां संसार धर्म वर्जित । होतां उपाधि समन्वित ॥
तेंच आभासे अब्रम्हवत । अविद्यामोहित जीवास ॥ १७ ॥

परब्रह्म तें मजहून भिन्न । तें मी नव्हे मी तों आन ॥
ऐसें जयाचें भेदज्ञान । तो मरणाधीन सर्वदा ॥ १८ ॥

जननापाठीं लागलें मरण । मरणापाठीं पुनर्जनन ॥
हें संसृतिचक्र परिवर्तन । पाठीस चिरंतन तयाच्या ॥ १९ ॥

दुष्कर यज्ञ तपोदान । इहीं जयाचें होय आपादन ॥
तें नारायण पद स्मृतिविहीन । स्वर्गायतन किमर्थ ॥ २० ॥

केवळ विषयभोगाचें स्थान । नलगे आम्हां तें स्वर्गभुवन ॥
जेथें न गोविंद नामस्मरण । काय कारण तयाचें ॥ २१ ॥

स्वर्गा जा अथवा नरका । फरक नाहीं विषयसुखा ॥
इंद्रा वा गर्दभा देखा । सुख विलोका एकची ॥ २२ ॥

इंद्र नंदनवनीं घोळे । तोच रासभ उकिरडा लोळे ॥
सुख पाहतां एकचि तुळे । नाहीं ते वेगळें लवमात्र ॥ २३ ॥

जेथूनि पुण्यक्षयें पतन । किन्निमित्त तदर्थ यत्न ॥
त्याहून वरवें एथील जनन । महत्त्वें गहन भूलोक ॥ २४ ॥

जेथें आयुष्य कल्पवरी । काय त्या ब्रह्मलोकाची थोरी ॥
अल्पायुष्य हो का क्षणभरी । भूलोक परी आणीक ॥ २५ ॥

क्षणभंगूर आयुष्यपण । केलें कर्म एक क्षण ॥
करी जो सर्व ईश्वरार्पण । पावे अभय स्थान तो ॥ २६ ॥

जेथें न भगवद्भक्त जन । करिती न हरिगुरुकथावर्णन ॥
संगीत नृत्य भगवत्पूजन । तें काय स्थान कामाचें ॥ २७ ॥

ब्रह्मात्मैकत्व विज्ञान । आत्यंतिक निश्रेयस साधन ॥
तें तों या स्वर्गाहून गहन । भूलोक हें स्थान तयाचें ॥२८॥

कायावाचामनें करून । करा पंचही प्राण समर्पण ॥
निश्चयात्मक बुद्धि ही लीन । होवो गुर्वधीन सर्वस्वीं ॥२९॥

एवं सद्गुरूस शरण जातां । भवभयाची कायसी वार्ता ॥
प्रपंचाची किमर्थ चिंता । असतां निवारिता सर्वस्वीं ॥ ३० ॥

अविद्येचा जेथें वास । तेथें पुत्र पश्वादि पाश ॥
संसारचिंता अहर्निश । नाहीं लवलेश सुविचार ॥३१॥

अविद्या सर्वा मूळ कारण । उपस्थापी नानात्वविंदान॥
आचार्यागम संस्कृत ज्ञान । तदर्थ संपादन करावें ॥३२॥